# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/१०/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

## प्राणांतिक अपघात

**१) पोस्टे खापाः—** अंतर्गत मौजा भोंडेताल ते रायवाडी जंगल परीसर रोड येथे दि. १५/१०/२४ चे ०९/०० वा. ते ०९/२० वा. दरम्यान फिर्यादी नामे— राहुल भाऊराव करनाके वय ३१वर्ष रा. भोंडेताल ता. सावनेर जि. नागपुर हा त्याच्या आईला त्याची मोटार सायकल क्र एम.एच.—४०/बी वाय २०९३ नी मौजा भोंडेताल वरून रायवाडी जंगल परीसरातुन रोडने जात असता समोरून येणारी चारचाकी वाहन क्र. एम.एच.—४०/सी.टी.—१२६१ वरील अनोळखी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मोटरसायकलला जोरदार धडक दिली.सदर अपघातात फिर्यादीची आई **मृतक नामे सौ. कांता भाऊराव करनाके वय ६१ वर्ष रा. भोंडेताल ता. सावनेर जि. नागपुर** हिचे अपघाती मृत्युस, फिर्यादीचे जखमी होण्यास व फिर्यादीच्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एम.एच.—४०/ बी वाय— २०९३ हिचे नुकसानी करीता कारणीभुत झाला व आरोपी हा फिर्यादीला मदत न करता तेथुन पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी याचे रीपोर्ट वरून पोस्टे खापा येथे अनोळखी आरोपीविरूद्ध कलम २८१, १२५(अ), १२५(ब), १०६(१), ३२४(२) बि.एन.एस.२०२३ सहकलम १८४, १८७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला असुन खापा पोलीसांनी सदर गुन्हयातील अनोळखी चालकाचा शोध घेवुन **आरोपी चालक नामे— धनपाल घसीटा उईके, वय ३५ वर्ष, रा. चिरटीमाल ता. तमीया जि. छिंदवाडा** यास ताब्यात घेतले आहे.

**२) पोस्टे मौदा :—** दि. १४/१०/२०२४ चे १३.३० वा. ते दि. १५/१०/२०२४ चे ००.१५ वा. दरम्यान अनोळखी इसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष हा नागपुर ते भंडारा हायवे रोडने कन्हान नदीच्या पुलावर माथनी येथील हायवे रोडवर पायदळ चालत असताना कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे वाहन भरधाव वेगाने व निष्काजी पणाने चालवुन अनोळखी इसमास जोरदार धडक दिल्याने अपघात झाला व सदर अपघातामध्ये अनोळखी इसम मृत झाला असुन यातील वाहन चालक तेथुन पळुन गेला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे— पो.अं. आशिष रडके, पोस्टे. मौदा यांचे रीपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे अज्ञात वाहन चालकाविरूद्ध कलम २८१, १०६(१) भा. न्या.सं सह.क. १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद असुन अज्ञात वाहन चालकाचा शोध मौदा पोलीस घेत आहे.

## अकस्मात मृत्यु

पोस्टे मौदा:— दिनांक १५/१०/२०२४ चे दुपारी ०१.३० वा. दरम्यान मौजा धानला येथे यातील **मृतक नामे— देवेंन्द्र रतीराम वैरागडे वय ३६ वर्ष, रा धानला** हा आपले घरी आंघोळ करण्यासाठी पाणी गरम करण्याकरीता बाथरूम मध्ये हिटर लावत असताना हिटरचा वायर कट असल्याने त्याला स्पर्श होवुन करंट लागल्याने सदर इसमास पुढील वैद्यकीय उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय मौदा येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृतक घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— कल्पेश टिकाराम वैरागडे वय २७ वर्ष, रा. धानला ता. मौदा यांचे रीपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे कलम १९४ बीएनएस प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ भगवान चांदेवार हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**